**श्री. मल्लिकार्जुन खर्गे यांस,**

आदरणीय खर्गेजी, राजकीय अगतिकतेमुळे जनतेने वारंवार नाकारलेले राहुल गांधी नावाचे तुमचे अयशस्वी उत्पादन पुन्हा एकदा पॉलिश करून बाजारात आणण्याच्या प्रयत्नात तुम्ही देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात तुम्ही व्यक्त केलेल्या भावना वास्तव आणि सत्यापासून कोसो दूर आहेत असे मला वाटते. तुम्हाला राहुल गांधींसह तुमच्या नेत्यांच्या गैरकृत्यांचा विसर पडला आहे किंवा तुम्ही त्यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसते म्हणूनच त्या गोष्टी सविस्तरपणे तुमच्या निदर्शनास आणणे मला महत्त्वाचे वाटते.

खर्गेजी, तुमच्या पत्रात तुम्ही सोईस्करपणे फक्त राहुल गांधींबद्दल बोललात, त्यामुळे मी ही राहुल गांधी यांच्यापासूनच सुरुवात करतो. ज्या व्यक्तीचा इतिहास देशाच्या पंतप्रधानांसह संपूर्ण ओबीसी समाजाला चोर म्हणत शिवीगाळ करण्याचा आहे, देशाच्या पंतप्रधानांविरुद्ध अत्यंत अशोभनीय शब्द वापरण्याचा आहे, ज्या व्यक्तिने संसदेत पंतप्रधानांना काठीने मारण्याची भाषा केली, त्यांच्या अहंकारी मानसिकतेची संपूर्ण देशाला जाणीव आहे , अशा राहुल गांधींचे समर्थन करण्याचा प्रयत्न तुम्ही कोणत्या अगतिकतेतून करत आहात ?

खर्गेजी, राहुल गांधींच्या आई सोनिया गांधी यांनीच मोदीजींसाठी मौत का सौदागर सारखा अत्यंत अशोभनीय अपशब्द वापरला होता. नाही का ? तुम्ही आणि तुमच्या पक्षाचे नेते या सर्व दुर्दैवी ,लाजिरवाण्या विधानांचा उदोउदो करत राहिलात. का? तेव्हा काँग्रेस राजकीय शुचितेचे मुद्दे विसरली होती का? 'मोदींची प्रतिमा डागाळणार' असे राहुल गांधी खुलेआम बोलले होते, तेव्हा खर्गेजी, राजकीय मर्यादा कोणी ओलांडल्या होत्या? तुमच्या अयशस्वी उत्पादनाचा सतत बचाव आणि त्यांचा गौरव करणे ही तुमची अगतिकता आहे, पण काँग्रेस अध्यक्ष असताना तुम्ही किमान या गोष्टींबाबत आत्मपरीक्षण करायला हवे होते.

खर्गेजी,अत्यंत खेदजनक बाब आहे की देशातील सर्वात जुनी राजकीय पार्टी कॉंग्रेस आजमितीला युवराजांच्या दबावाखाली केवळ कॉपी पेस्ट वाली पार्टी बनली आहे. राजकीय लालसेची पराकाष्ठा करत काँग्रेस आता राहुल गांधींचे दुर्गुण ही अंगिकारू लागली आहे आणि दुर्दैव म्हणजे त्यातच पक्षाला कृतकृत्य झाल्यासारखे भासत आहे.

मागील १० वर्षात पंतप्रधानांवर काँग्रेस नेत्यांनी ११० हून अधिक शिव्यांचा भडिमार केला आणि दुर्दैव म्हणजे त्यात काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाचाही समावेश होता. मग त्यावेळी राजकीय शुचिता, मर्यादा, शिस्त, शिष्टाचार,सभ्यता यासारखे शब्द तुमच्या आणि काँग्रेस पक्षाच्या शब्दकोशातून गायब का होतात ? एकीकडे राजकीय शुचितेच्या गोष्टी करायच्या आणि त्याचवेळी तुमचा पक्ष आणि नेतेमंडळी वारंवार राजकीय नैतिकता खुंटीवर टांगून ठेवतात. अशी दुटप्पी भूमिका का ?

खर्गेजी, तुमचे नेते देशाच्या पंतप्रधानांबद्दल काय बोलले नाहीत? कधी मोदी तुझी कबर खोदणार असे म्हटले गेले, कधी नीच, कधी हरामी, कधी 'मृत्यूचे व्यापारी, कधी विषारी साप, कधी विंचू, कधी चुडा, कधी रावण, कधी भस्मासुर म्हटले गेले. कधी नालायक', कधी कुत्र्यासारखे मरण येईल, कधी जमिनीत गाडण्याची भाषा केली गेली. कधी राक्षस, कधी दुष्ट, कधी खुनी, कधी हिंदू जिना, कधी जनरल डायर, कधी मोतीबिंदूचे रुग्ण, कधी खिसेकापू , कधी घाणेरडा नातू, कधी काळे इंग्रज, कधी काफिर, कधी औरंगजेबाचा आधुनिक अवतार, कधी दुर्योधन, कधी हिंदू दहशतवादी, कधी गाढव, कधी नपुंसक, कधी चौकीदार चोर आहे , कधी तुघलक. कधी साला, कधी नमक हराम, कधी अशिक्षीत, कधी नालायक. हे सगळे कमी म्हणून की काय त्यांच्या आई-वडिलांचाही अपमान करण्यात आला. स्वतंत्र भारताच्या इतिहासात तुमच्या पक्षाच्या नेत्यांनी देशाच्या पंतप्रधानांचा जेवढा अपमान केला आहे, तेवढा अपमान कोणत्याही नेत्याचा आत्तापर्यंत केला गेला नाही. एवढेच नाही. तुमच्या पक्षातील ज्या नेत्यांनी देशाच्या पंतप्रधानांना जितक्या अधिक शिव्या दिल्या त्यांना काँग्रेसमध्ये मोठी पदे देण्यात आली. मी अशी उदाहरणे सांगायला सुरुवात केली तर त्यांच्यासाठी वेगळे पुस्तक लिहावे लागेल हे तुम्हालाही ठाऊक आहे. अशा वक्तव्यांनी आणि कृतींमुळे देशाला लाजवले नाही का .. आणि राजकीय शिष्टाचाराचा भंग तेव्हा झाला नाही का? खर्गेजी तुम्ही हे सगळे कसे विसरलात?

खर्गेजी, तुमच्या कॉंग्रेस पक्षाला राहुल गांधी यांच्याबद्दल का अभिमान वाटतो हा प्रश्नच आहे. राहुल गांधी हे पाकिस्तानातील भारतविरोधी शक्तींबरोबर नेहमी चर्चा करत असतात म्हणून तुम्हाला राहुल गांधींचा अभिमान वाटतो की ते

परदेशात जाऊन दहशतवाद्यांचे समर्थन करणाऱ्या कार्यक्रमाला उपस्थित राहतात म्हणून त्यांचा अभिमान वाटतो? अनेकदा राहुल गांधी हे देशविरोधी शक्तींकडून काँग्रेसला पाठिंबा मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त करतात. त्याबद्दल तुम्हाला राहुल गांधींचा अभिमान वाटतो का? विदेशी शक्तींनी भारताच्या लोकशाही प्रक्रियेत हस्तक्षेप करावा, यासारखी मागणीही तुमचे राहुल गांधी करतात. त्याबद्दल तुम्हाला राहुल गांधींचा अभिमान वाटतो का? आरक्षण आणि जाती-पाती या विषयाचे राजकारण करत समाजातील विविध वर्गांना एकमेकांमध्ये लढवण्याचे पातक करणाऱ्या राहुल गांधींचा तुम्हाला अभिमान वाटतो का? अलिकडेच राहुल गांधींनी विदेशात जाऊन देशातील दलित आणि मागासवर्गीयांचे, आदिवासी समाजाचे आरक्षण संपवण्याची भाषा केली. त्याबद्दल तुम्हाला त्यांचा अभिमान वाटतो का? जम्मू-काश्मीरमध्ये अनेक वर्षांनी शांतता नांदू लागली आहे. ही शांतता नष्ट व्हावी, अशी विधाने राहुल गांधी करत असतात, काश्मीरमधील अतिरेक्यांची सुटकेची मागणी करत असतात, पाकिस्तानबरोबर पुन्हा व्यापार सुरू करावा, काश्मीरमध्ये 370 वे कलम पुन्हा लागू करावे, यासारख्या मागण्याही ते करत असतात. याबद्दल तुम्हाला राहुल गांधी यांचा अभिमान वाटतो का? पाकिस्तानातील दहशतवाद्यांपेक्षाही भारतातील हिंदू धोकादायक आहेत, यासारखी भाषा राहुल गांधी करत असतात, सनातन हिंदू संस्कृतीचा वारंवार अपमान करत असतात, देशासाठी हौतात्म्य देणाऱ्या शूरवीर जवानांच्या शौर्याचा पुरावाही तुमचे राहुल गांधी मागतात. जवानांच्या शौर्याला राहुल गांधी 'खून की दलाली' अशी उपमा देतात, शीख धर्मीयांच्या पगडी आणि हातातील कड्याबाबत वादग्रस्त वक्तव्य करतात. अशा राहुल गांधींच्या समर्थनासाठी तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहीता, याचे म्हणूनच आश्चर्य वाटते. राहुल गांधी यांच्या अशा अनेक वक्तव्याकडे तुम्ही दुर्लक्ष करता, यातूनच तुमचा दुटप्पीपणा दिसून येतो.

खर्गेजी, राहुल गांधी यांच्या प्रमाणेच सॅम पित्रोदा, इम्रान मसूद, के.सुरेश, दिग्विजय सिंह, शशी थरूर, पी. चिदंबरम, सुशिलकुमार शिंदे यांच्यासारख्या अनेक मंडळींनी भारताला बदनाम करण्यासाठी काय-काय उचापती केल्या, याची माहिती तुम्हाला नाही का? उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्यात विद्वेष निर्माण व्हावा, विविध जाती-जमाती एकमेकांविरोधात उभ्या ठाकाव्यात, अशी भाषा तुमचे वरील नेते करीत असतात. तुमच्या पक्षाच्या नेत्यांच्या कार्यक्रमात पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा दिल्या जातात, त्यावेळी तुम्हाला पंतप्रधानांना पत्रे लिहावे, असे कधी वाटले नाही.

खर्गेजी, भारताच्या महान लोकशाही व्यवस्थेला सर्वाधिक अपमानित आणि कलंकित करण्याचे पाप तुमच्या काँग्रेस पक्षाचेच आहे. देशावर आणी-बाणी लादून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटण्याचे काम काँग्रेसनेच केले आहे. मुस्लीम महिलांवर अन्याय करणाऱ्या तिहेरी तलाकसारख्या अमानुष प्रथेचे समर्थन तुमच्या काँग्रेस पक्षानेच केले. देशातील घटनात्मक संस्थांना बदनाम करण्याचे काम तुमच्या काँग्रेसनेच केले. देशाच्या साधन संपत्तीवर पहिला हक्क विशिष्ट धर्मियांचाच आहे, अशी भाषा कोणी केली होती, हे तुम्हाला नक्की आठवत असेल. काँग्रेसचे सरकार ज्या राज्यांमध्ये आहे तेथे दलित, मागासवर्गीय आणि आदिवासींचे हक्क हिरावून घेतले जात आहेत, हे तुम्हाला माहीत असेलच. तुमचे राहुल गांधी 'मोहब्बत की दुकान' अशी भाषा करत सत्तेच्या मोहासाठी विविध जाती-धर्मियांमध्ये एकमेकांबद्दल द्वेष निर्माण करत आहेत. राहुल गांधींच्या भाषेतून अनेकदा देशविरोध स्पष्टपणे दिसतो. परदेशात जाऊन भारताला बदनाम करण्याचे उद्योग तुमचे राहुल गांधी करतात. तुमच्या पक्षाला आणि राहुल गांधींना पडलेल्या प्रश्नांची उत्तरे आता मिळाली असतील, अशी मला आशा आहे. तुम्हाला परमेश्वराने सद्बुद्धी द्यावी आणि देशहितासाठी काम करण्याची शक्ती द्यावी, अशी प्रार्थना करतो आणि माझे पत्र संपवतो.